MARATHI

# चिट्टी

## एक भूभू आणि तिचं जंगलातलं शेत




कथा : सेरो

रेखाचित्रं : राजीव आइप



एकलव्य

# चिट्टी

## एक भूभू आणि तिचं जंगलातलं शेत

सत्यकथेवर आधारित

कथा : सेरो

रेखाचित्रं : राजीव आइप

अनुवाद : सुजाता देशमुख



एकलव्य

*वुफ वुफ*

*आणि*

*खूप सारे धन्यवाद!*

*AeaarVee, EssCee, TeeBee, AeCee.*

*Essech, अखेरच्या वियोगाच्या क्षणी, मला हळुवारपणे समजून घेतलंस.*


*EmTee, EmGee, तुमची खूप आठवण येते... तुम्हाला किती आनंद झाला असता.*



# शहरातली चिंटू चिट्टी!

पुणे शहराच्या रस्त्यावर चिट्टीचा जन्म झाला. पावसाळ्यातली ती  एक वादळी रात्र होती. मनीषा नावाच्या माझ्या प्रेमळ मैत्रिणीनं चिट्टीला आपल्या घरात घेतलं. छोटंसं, पांढरंशुभ्र, गोजिरवाणं, मण्यांसारख्या काळ्याभोर लुकलुकत्या गंभीर-आर्जवी डोळ्यांचं दाराशी आलेलं ते पिल्लू. त्याच्याकडे पाठ फिरवणं खरोखरीच अवघड. 'या पिल्लाला असं सोडून जायचं नाही म्हणजे नाही', असं पावसानं, वादळानं आणि विजेनं तिला अत्यंत आग्रहानं पटवून दिलं.

"तुला चिट्टी हवीये?" मनीषानं मला विचारलं. "उम्म.., अंर.., घेऊ का? वाटतंय खरं.." आणि मग एकदम "हो, घेते" असं ठामपणे माझं मन आणि माझं तोंड एकदमच म्हणालं. कर्नाटकातल्या पश्चिम घाटातल्या जंगलामध्ये माझं शेतघर आहे. मग एका जीपमध्ये बसून चिट्टीबाई पुण्याहून माझ्याकडे आल्या.



एका आर्द्र पानगळीच्या घनदाट जंगलाच्या मध्यभागी मी राहते. आमच्या या जंगलात शिसव, दालचिनी, नीर फणस आणि सालई अशी झाडं आहेत. या सालईच्या खोडापासून धूप बनवतात. माझी एक फळबागसुद्धा आहे. त्यात केळी, सुपारी, कोको यांची लागवड तर मी केलीच आहे, शिवाय लवंग, जायफळ, वेलची, हळद यांसारखी मसाल्याची झाडंही लावली आहेत. बागेचा एक लहानसा कोपरा भाजीपाल्यासाठी मी राखून ठेवला आहे. माझ्या सगळ्यात जवळच्या शेजाऱ्याकडे जायचं झालं, तर मला जंगल ओलांडून, तीन डुगडुगणारे पूल ओलांडून भाताच्या शेतांतून वाट तुडवीत जावं लागतं. 'किती दुर्गम भाग आहे हा', असं काहीजण म्हणतात!



आता काहीजणांना हे काहीच्या बाही दूर वाटत असेलही, पण माझं शेतघर म्हणजे माझ्या विश्वाचा केंद्रबिंदू आहे. आमच्या इथे अधूनमधून रात्री-अपरात्री वाघाच्या डरकाळ्या ऐकू येतात. अशा जंगलात चिट्टीसारखं एवढुस्सं, भित्रं छोटं पिल्लू कसं काय तगून राहणार याची मला काळजी लागून राहिली होती. शिवाय माझ्या स्क्रॅबल नावाच्या दुसऱ्या धटिंगण कुत्र्याशी तिची गाठ होती. तशात स्क्रॅबलला घरात मालकाच्या रुबाबात वागायची सवय. परंतु बघता बघता अल्लाद शांतपणे चिट्टी आपल्या जंगलातल्या शेतघरात रुळली.



# आकाश निरीक्षक चिट्टी

मग चिट्टीला लाडाची अनेक नावं मिळाली.



चिटकू

चिन-चिन

हॅल्लो चिट्टी

नानी पट्टानी

मुनिया

मोमो गर्ल

मिस इडली

चिट्टीणी-मिस-चटणी



आमच्या जंगल रपेटीत चिट्टी गुल झाली, की मी “चिssssssट्टीssss” अशी जोरदार हाळी देत असे. त्यामुळे दचकून झाडांच्या शेंडयावर बसलेले लंगूर आपलं खाणं थांबवून खाली बघत. या फांदीवरून त्या फांदीवर त्यांच्या माकडउड्या सुरू झाल्या, की खालून चिट्टीला त्यांचा पाठलाग करायला फार आवडे. झाडांना चुकवत ती वेगात पळे. कधीकधी माकडं वरून तिच्यावर फळं फेकत. मग घरी आलेल्या चिट्टीचं तोंड कोकमाची फळं खाऊन आमसुली रंगात माखलेलं असे, किंवा तिच्या तोंडाला पिकल्या फणसाचा वास येई.



चिट्टी प्रेमळ पण आत्मसंतुष्ट होती. ना कधी माझ्या पायात घुटमळे, ना कधी माझं लक्ष वेधून घेई. मग तिच्या तिनं स्वत:च्या अशा अगदी वेगळ्या आवडी जोपासायला सुरुवात केली. उदाहरणार्थ आकाश-निरीक्षण!


माझ्या शेतघरातल्या रात्री खरोखरीच काळ्याविभोर असतात. शहरासारख्या नव्हेत. तिथे रस्त्यांवरचे मोठाले दिवे असतात. इथला काळोख इतका मिट्ट असतो, की आकाशातल्या चमचमत्या नक्षत्रांकडे  तुम्ही कितीही वेळ बघत राहू शकता, नभाच्या भव्यतेचा भाग होऊ शकता. चिट्टीसुद्धा अशीच तासनतास बसायची. आपल्या उंचावरच्या दगडी कट्ट्यावर स्थानापन्न होऊन रात्रीचं आकाश बघत बसणं हा तिचा छंद होता. अवकाशात पहिली हबल दुर्बिण सोडण्यात आली होती. या हबल दुर्बिणी द्वारे बघण्याची पात्रता फेरी कुणी घ्यायची ठरवलीच, तर त्यात उत्तीर्ण होऊन ती जगातली पहिली श्वान अवकाश निरीक्षक होऊन इतिहास घडवणार! असा मी विनोदही करीत असे. ग्रह-तारे निरीक्षणात ती एवढी गुंगून जाई, की झोपायची वेळ झाली की तिला आत येण्यासाठी मला ढुसण्या द्याव्या लागत. शेतघरातल्या माझ्या अगदी सुरुवातीच्या वास्तव्यात बिबट्यानं माझ्या एका कुत्र्याची शिकार केलेली असल्यामुळे रात्रीचं त्यांना आत घरात ठेवण्याच्या बाबतीत मी अगदी सावध आणि आग्रही होते.






# वाळवीची मेजवानी — आणि आणखी 'चर'णी!

जे खाणं माझं, तेच माझ्या कुत्र्यांचं! हातसडीचा लाल भात, पोळ्या, बाजरीचं आंबील, निरनिराळ्या डाळींच्या आमट्या, भाज्या, नारळ, ताक, दूध, अंडी, कधी कधी मासे वा क्वचित हाडं. खाण्यापिण्याचे तसे चिट्टीचे नखरे नव्हते, पण सावकाश खायची. स्क्रॅबलचं तसं नव्हतं. तो म्हणजे बकाबका खाऊन फस्त करायचा. चिट्टीला विशेषकरून तांदळाच्या पिठाच्या केलेल्या चक्कूल्या, तिखट पोहे किंवा मंडक्की, खोबरेल तेलात तळलेले केळ्याचे आणि फणसाचे ताजे काप आणि केळीच्या पानांत फणसाचे कडबू घालून उकडलेला भात फार आवडे.



घामटं काढणाऱ्या दमट उन्हाळ्यात जंगलातून नदीकाठानं आपल्या कुत्र्यांना घेऊन फिरत फिरत जाण्याचा माझा शिरस्ता होता.अशा भटकंतीत खूप शिरा असलेले, किंवा तंतुमय आंबे वेचण्याचा आनंद फारच मोठा. नदीकाठी अशा आंब्यांचे भलेथोरले वृक्ष होते. आंबे हुडकण्याच्या अशा फिरस्तीमधून गोळा केलेल्या आंब्यांचं मी 'सासमे' करीत असे. दह्यामध्ये, आंब्याच्या फोडी, खवलेला नारळ, फेटलेली मोहरी, मीठ आणि मिरचीचे तुकडे. माझ्या हातच्या 'सासमे'चं एखादं चाटण चिट्टी घेत असे.





कडक उन्हाळा संपून पावसाळ्याच्या सुरुवातीला झुंडीनं भिरभिरणाऱ्या पंखांच्या पाकोळ्या गट्ट करणं चिट्टीला फारच आवडे. पहिल्या पावसाचे थेंब पडताच जमिनीतून अळ्या बाहेर येत. एका रात्रीपुरते त्यांना पंख फुटून या पाकोळ्या सगळीकडे स्वैर विहार करीत. इकडे वर त्या हिंडताहेत आणि मध्ये चिट्टी चपळाईनं उड्या मारत त्यांना पकडते आहे. भिंतीवरची पाल आणि चिट्टी यांची, हा पोषक, समृद्ध आहार मिळवण्याची स्पर्धा बघणं म्हणजे मोठीच गंमत. जोडीदार मिळालेली पाकोळी भाग्यवान. त्या परत जमिनीत गुडूप होत. दुसऱ्या दिवशी मेलेल्या इतर पाकोळ्यांचा पातळ गालिचासारखा भुईवर सडा पडलेला असे.



मुनाफ भाई हे चिट्टीच्या घट्ट मित्रांपैकी एक. आठवड्यांतून अनेकवेळा सकाळी आमच्यासाठी मासे घेऊन त्यांची फेरी असे. त्यांच्या मोटरसायकलला मागे बांधलेल्या खोल परडीमध्ये मी डोकावून बघत असे. “आज काय आणलं आहेत मुनाफ भाई?”

आपल्यासाठी काय येऊ घातलं आहे, याचा बरोब्बर अंदाज येऊन चिट्टी माझ्याशेजारी वाट बघत उभीच असे. मुनाफ भाईंची पहिली आणि आवडती ग्राहक म्हणजे चिट्टी. एक छानसा तारली मासा निवडून हसत चिट्टीकडे पाहत मुनाफ भाई तो हवेत भिरकावून देत असत. मग काय! चिट्टीबाई उडी मारून निष्णातपणे वरच्या वर तो मासा जबड्यात झेलीत आणि चवीचवीनं हाडांसकट खाऊन टाकीत.

हा सोहळा पार पडल्यानंतरच मुनाफ भाई माझ्याकडे लक्ष देत.

# माझ्या शेतघरातले भीतीदायक सरपटणारे प्राणी



मे महिन्यात वळवाचा पाऊस झाल्यानंतर माझ्या मातीच्या शेतघरात सगळ्या प्रकारचे सरपटणारे प्राणी आसऱ्याला येत. एकदा रात्री चिट्टीच्या झोपण्याच्या जाजमाशेजारी एक मोठा काळा विंचू आला. माझ्या दारावर आपल्या पायांनी खरवडत तिनं मध्यरात्री मला जागं केलं. डंख मारायच्या तयारीतच विंचू होता. इतक्या अंधारात चिट्टीला हे कसं कळलं आणि मदतीची गरज तिनं कशी ओळखली कोण जाणे! प्राण्यांना अशा उपजत प्रेरणा असाव्यात बहुतेक. विंचवाचं प्रत्यक्षात असण्यापेक्षा दिसणं जास्त भयानक होतं. हुसकून त्याला मी मोठ्या कागदावर घेतला आणि बाहेर फेकून दिला.

एकदा माझ्या बाकड्याखाली एक गलेलठ्ठ साप वेटोळं घालून बसलेला चिट्टीनं निदर्शनाला आणला, तेव्हा मात्र माझी गाळण उडाली. “चंद्री, चंद्री, लवकर धाव..” माझ्या शेतावरच्या मदतनिसाला मी हाक दिली. दोघींनी मिळून सापाला बाहेर हाकलण्याचा प्रयत्न सुरू केला. तोही आमच्याइतकाच घाबरला होता. त्यामुळे इथे तिथे सरपटत होता. तो कोणताही विषारी साप नसून उंदीर खाणारा बिनविषारी जातीचा आहे हे लक्षात येताच मी सुटकेचा नि:श्वास सोडला. आम्ही घराबाहेर व्हरांड्यापर्यंत त्याला हुसकत आणला. पण बाहेर माळरानात जाण्याऐवजी तो माझ्या आरामखुर्चीत चढून बसला.

हे चिट्टीला बिलकुल खपलं नाही. तिला सापांची अजिबात भीती नव्हती. ‘हे माझं घर आहे आणि ही तुझी खुर्ची नव्हे’, असा तिचा विचार मला चक्क जाणवला. तिनं सापावर पंजा मारताच त्यानं अंग आक्रसून घेतलं. पण तेवढंच. त्यानंही फणा काढून चिट्टीवर झेप घेताच मागे सरायची तिची पाळी आली. खुर्चीतला साप आणि जमिनीवरची चिट्टी यांच्यातली ही आळीपाळीची चढाई थोडा वेळ सुरू असतांना चंद्री आणि मी मागून “हे शू शू ..” असा आरडाओरडा करीत त्याला हाकलायचा प्रयत्न करीत होतो. कोणालाच इजा होऊ नये याची आम्हाला काळजी होती. या दोघांना एकमेकांपासून दूर करतांना आमचा दोघींचा वेगळाच नृत्य-गान कार्यक्रम सुरू होता.

अखेर चिट्टीनं माघार घेतली आणि साप पळाला. उंदीर खाणारे साप उपयुक्त असतात आणि या सापानं माझ्या घरातल्या एकदोन उंदरांचा फन्ना केला असेल अशी मला उगीचंच आशा वाटली.



# धुवांधार जादूई पावसाळा

पश्चिम घाटातला धुक्यानं आणि दवानं वेढलेला पावसाळी निसर्ग खास असतो खरा. परंतु सोसायला तितकाच कठीणही! सतत, अव्याहत कोसळणाऱ्या पाण्याचा पडदा आणि सूर्यप्रकाशाचा जवळपास मागमूसही नाही, असा. पावसाळ्याचे चारही महिने घरात दमटपणा आणि बुरशी आलेली असते. भिंतींना, पुस्तकांना, अंथरुणा-पांघरूणांना, अगदी आपल्या कपड्यांनाही! हवा अशी, की एखाद्या दिवशी उठायला उशीर झाला, तर कानांतून अळंब्या उगवतील की काय अशी शंका येते.


मात्र, ढगांचा गडगडाट आणि विजांचा कडकडाट घेऊन आलेली ती रात्र मी कधीच विसरणार नाही. वीज नसल्यामुळे काळाकुट्ट अंधार होता. मदतीला बोलवावं तर फोनही नाही. पावसाचा जोर वाढतच राहिला आणि प्रत्येक गडगडाटानंतर कान फाटतील की काय, असा भीतीदायक आवाज. हे असं काही मी पहिल्यांदाच अनुभवत होते. शेतघरामधल्या इतक्या वर्षांच्या माझ्या वास्तव्यातली ती सगळ्यात घाबरवणारी वेळ होती.

जिथे जिथे विजेचे प्लग पॉइंट्स होते, तिथून तिथून ठिणग्या उडायला सुरुवात झाल्यामुळे घरावर वीज कोसळेल की काय, अशी मला भीती वाटू लागली. परिस्थिती आणीबाणीची होती. मला सुरक्षित आडोसा शोधणं भाग होतं. चिट्टी माझ्यापेक्षा विचारांत तसूभर पुढे होती. प्राण्यांमधल्या अंत:प्रेरणेनं की काय कोण जाणे, तिनं माझ्या झोपायच्या खोलीकडे धाव घेतली, पाठोपाठ स्क्रॅबल आणि मीही धावलो. माझ्या शेतघरातली ही सगळ्यात सुरक्षित जागा होती हे माझ्या तत्क्षणी लक्षात आलं. माझी झोपायची खोली आणि कौलारू छप्पर यांच्यामध्ये मातीनं लिंपलेला एक सणसणीत लाकडी पोटमाळा आहे. घरातल्या कुठल्याही भागापेक्षा इथे आम्ही सर्वाधिक सुरक्षित होतो.



खोलीचं दार मी लावून घेतलं आणि आम्ही तिघंजण एकमेकांना बिलगून बसलो. आपल्या या मूक साथींभोवती माझ्या हातांचा वेढा होता. भीतीदायक गडगडाट आमचा पाठलाग करीत असतांना आमच्या तोंडून हूं की चू बाहेर पडलं नाही. पुढची पंधरा मिनिटं म्हणजे जणू काळ थांबला होता. पण मग हलके हलके वादळ शमलं.


माझ्या मनावर हा प्रसंग कायमचा कोरलेला राहील. केवळ भीतीदायक म्हणून नव्हे, तर चिट्टीच्या थक्क करणाऱ्या प्रसंगावधानामुळे आम्ही कसे सुरक्षित राहिलो, म्हणून.





मात्र तरीसुद्धा पाऊसमान आणि त्याचं वेळापत्रक दरवर्षी बदलायला लागलं. जागतिक हवामान बदलाचे वारे आमच्याकडेही घोंगावायला लागले होते. मी इथे राहायला आले त्या अगदी सुरुवातीच्या काळात जूनच्या पहिल्या आठवड्यात आम्ही पावसाचं स्वागत करीत असू. मग हळूहळू त्याचं आगमन पुढे पुढे जायला लागलं. ऐन पावसाळ्यातसुद्धा अनेक दिवस लख्ख सूर्यप्रकाश आणि मग अचानक रपारप पावसाच्या सरी यायला लागल्या. काही वर्षांपूर्वी हे असं काही कल्पनेच्या पलीकडचं होतं. सप्टेंबर महिन्याच्या शेवटी कमी कमी होत जाणारा पाऊस आता इतिहासजमा होऊन डिसेंबरपर्यंत पावसाळा लांबू लागला.

माझ्या शेतीच्या आजूबाजूला राहणारे सगळे शेतकरी होते आणि त्यांच्या पिकांची सगळी मदार पावसावर होती. हवामानाचा बदल आणि पावसाचा लहरीपणा त्यांच्या पचनी कसा पडणार, याची मला काळजी वाटली.



# तरणे आणि म्हातारे पाहुणे

हिवाळ्यात हवा छान आल्हाददायक झाली, की माझ्या शेतघरात राहायला अनेक पाहुणे यायचे. अगदी लहान मुलांपासून ते पार ऐंशीच्या घरातल्या म्हाताऱ्या-कोताऱ्यांपर्यंत. माझ्या इथे यायला ते फार खूश असत. विशी-तिशीच्या उंबरठ्यावरच्या तरुण मंडळींना आपलं आयुष्य आणि भवितव्य यांची चिंता असे. एरवीच्या घरच्या रोजच्या धकाधकीच्या जीवनातल्या सगळ्या समस्या, चिंता तात्पुरत्या माघारी विसरून इथे त्यांच्या मनाला शांतता मिळे.

मला त्याचं अजिबातच आश्चर्य नव्हतं. तुम्हाला वर्तमानात जगायला कसं आणून सोडायचं, ते जंगलाला बरोबर माहिती असतं.आता असं बघा, झाडांच्या उंच फांद्यांच्या छपरांमध्ये या फांदीवरून त्या फांदीवर एकमेकींशी पाठशिवणीचा खेळ खेळणाऱ्या मलबारी शेकरूंचा खेळ पाहता पाहता तुमचं देहभान हरपून जातं. चॉकलेटी-लाल रंगाच्या केसाळ कातडीचं, झुपकेदार शेपटाचं शेकरू बघता बघता तुमच्या नजरेसमोरून नाहीसं होतं. आता काही ते परत दिसणार नाही असं वाटत असतांनाच,हिरव्या पानांच्या आडून ही महाकाय खार आपल्याकडे बिटबिट्या डोळ्यांनी थेट डोळ्यांत डोळे घालून बघतांना दिसते. आणि त्या क्षणाला भूतकाळाबद्दलचे वा भविष्यकाळाबद्दलचे सगळे विचार मनातून नाहीसे होतात.





चिट्टी अनेकदा आमच्या पाहुण्यांना फिरायला घेऊन जात असे. लोकांना काय हवंय याची तिला उपजतच जाण होती. पाहुणे मंडळी तिच्या मागेच आहेत ना, याची अधूनमधून वळून ती खात्री करून घेत असे. मग काहीवेळा भराभर शेपूट हलवत तिचं डोकंही तेवढ्याच वेगात मागेपुढे व्हायला लागलं, की समजावं, 'जरा खेळूया की.. सगळ्या काळज्या आत्ता पळून जातील' असं तिला सुचवायचं आहे.

विशेषत: निसर्ग शिबिरांसाठी येणाऱ्या शहरी मुलांना चिट्टी फार आवडे. त्यांच्याकडून आंजारून गोंजारून घेतांना आणि पोट खाजवून घेतांना ती शांतपणे पडून असे. मग या पोरांचं आनंदानं खिदळणं शेतभर ऐकू येई. कुत्र्यांना प्रचंड घाबरणारी लहान मुलंसुद्धा चिट्टीशी एकदा का मैत्री झाली, की भीती-बितीच्या बाहेर पडत.

माझी मन:स्थिती समजण्याची आणि एकूण घराची काळजी घेण्याची चिट्टीमध्ये कमाल उपजत बुद्धी होती. एके दिवशी मी एका लांबच्या सफरीवरून घरी आले. बरोबर एक पाहुणाही होता. आम्ही दोघंही पार आजारी होतो. इतके, की आमच्या कुत्र्यांना जेमतेम गोंजारून आम्ही आडवे झालो. चिट्टीचा फारच गोंधळ उडाला. हे काय? नेहमीचे खूप लाड कसे नाहीत? मग तिनं स्वतःही आजारी पडण्याचा निर्णय घेतला. मग थोड्याच वेळात तिला उलटी झाली आणि अगदी घाण वासाचा गोळा तिनं ओकला. अरे बापरे. मी थक्क झाले. तिनं मानवी विष्ठा खाल्ली होती. आम्ही आल्यानंतर ती तिनं नंतर जंगलात जाऊन कुठेतरी खाल्ली असणार. आम्ही आजारी बघून तिचा, तिच्या पद्धतीचा हा अस्वस्थ प्रतिसाद होता.

माझ्याकडे कंपोस्ट खत करण्यासाठी शुष्क शौचालय होतं. त्यात मी तिची उलटी गोळा करून टाकली आणि चिलटं, माश्या होऊ नयेत म्हणून त्यावर राखेचा चांगला थर टाकला. या शौचालयाचा उपयोग करतांना पाण्याचा वापर करावा लागत नाही. दर काही महिन्यांच्या अखेरीला त्यांपासून झाडांसाठी उत्तम सोनखत मिळत राहतं. नशीब, चिट्टीनं पुन्हा कधी मानवी विष्ठा खाल्ली नाही. पण हा प्रसंग म्हणजे तिची सह-अनुभूती दाखवण्याची ताकद आणि आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांबाबतीतली तिची संवेदनशीलता मला दिसून आली.



# आमचे जंगल मित्र



कोणतंही आर्द्र पानगळीचं घनदाट जंगल निरोगी असण्याची एक मोठी खूण म्हणजे जळवा. आणि पावसाळ्यात आमच्याकडे त्या भरपूर सापडायच्या. अनेकवेळा जमिनीवर रक्त सांडलेलं बघून चिट्टीला जखम झाली की काय, असं वाटेस्तोवर तिच्याशेजारी रक्तानं लडबडलेली जळू पडलेली दिसायची.

संरक्षणासाठी मी पायांत गमबूट घालीत असे. पण पावसाळी सहलीसाठी आलेल्या पाहुण्यांना एक ते पाच जळवांचा पाहुणचार करावा लागे. मग त्यावर, “जंगलासाठी तुमचं हे रक्तदान आहे” असा विनोद मी करीत असे.

जळवांच्या व्यतिरिक्त महाधनेश आणि सोनपाठी सुतार यांचा आमच्या जंगलमित्रांमध्ये समावेश होता. उन्हाळ्यात काजव्यांनी सुशोभित झाडं झळाळून उठत. लांब पारदर्शक पंखांच्या सिकाडा किड्यांची किरकिर, डोंगरी मैनेची शीळ, ड्रोनसारखा आवाज करीत जथ्यानं डोक्यावरून घोंगावत जाणाऱ्या जंगली गांधील माश्या आणि वेगवेगळ्या पक्ष्यांच्या आवाजांची नक्कल करीत, गाणी गात जंगल जागवून सोडणारे पल्लवपुच्छ कोतवाल!

आणि अर्थातच पावसाळ्यातला संततधारांचा तो आवाज! शेतावरच्या आमच्या आयुष्याला संगीताची आणि कलात्मकतेची अशी पार्श्वभूमी होती. शहरात गेले, की या सगळ्याची आठवण येऊन मला हुरहुर लागे. शेती आणि जंगलातल्या आयुष्याचा आनंद माझ्या नातेवाइकांना आणि मित्रमंडळींना मिळाला तर किती बहार येईल, असं मला वाटे. आपल्या नागरिकांकरिता असं एखादं राखीव जंगल किंवा मोकळं सोडलेलं माळरान प्रत्येक शहरात असावं, असं मला मनोमन वाटे.

जंगल हेच जणू खरं घर असावं, इतकी त्यात चिट्टी एकरूप झाली होती. तिचं सतत निरीक्षण हाच माझ्या रोजच्या नवनवीन शिक्षणाचा पाया होता. ती माझी साथीदार होती, माझी भागीदार होती. तिचं वय जसजसं वाढत गेलं, तसतसा आमच्यातला संवाद अधिक सहज, तरल होऊ लागला. माझे शब्द आणि उत्तरादाखल तिचं हलकेच भुंकणं, सुस्कारे आणि शरीराची हालचाल यांतून आमच्या किती खास गप्पा चालत!



# अशीच वर्षं सरत गेली...

आणि मग दिवस, महिने, वर्षं जात राहिली. एकाआड एक ऋतूही येत राहिले. आयुष्याची भरती-ओहोटीही सुरूच राहिली. झाडं, झुडुपं बहरत, फळत राहिली. माणसांना आणि इतर जिवांनाही या झाडांनी फळांच्या मेजवान्या दिल्या. उन्हाळ्यात पानगळ सुरू होत असे. मग पुन्हा कोवळी पोपटी पानं नव्यानं बहरून येत. सूर्य उगवायचा, तसा मावळायचाही. तोच चंद्राचाही दिनक्रम. उगवायचं आणि मावळायचं. पौर्णिमेचा अख्खा चंद्र हळूहळू चंद्रकोरीत बदलत जात असे. निसर्गाच्या या चक्र-तालात आमची आयुष्यं गुंफलेली होती.

रोजचा बदल आणि तरीही बदल नसलेली.



उन्हाळ्यापासून सुटकेसाठी स्क्रॅबल आणि मी अनेकवेळा नदीत डुबक्या घेत असू. पण चिट्टी कधीच आमच्याबरोबर पाण्यात उतरली नाही. या भूभागावर ‘नायक’ घराण्याच्या राजांनी बराच काळ राज्य केलं होतं. त्यांनी पाचशे वर्षांपूर्वी नदीकाठी बरीच कोरीव लेणी खोदली होती. या कोरीव कामांचं निरीक्षण हा चिट्टीचा छंद होता. इथल्या स्थानिकांनी नदीला “देवरहोळय’, म्हणजे ‘देवांचं घर’ असं नाव दिलंय. ती पुढे वाहतांना निरनिराळे पाण्याचे प्रवाह पोटात घेत वाढत जाऊन ‘बेडथी’ होते आणि शेवटी घाटातून प्रचंड धबधब्यांच्या रूपात अरबी समुद्रात लुप्त होते.





जंगलातली आमची भटकंती म्हणजे निसर्गाशी आमच्या एकतानतेचं रूपच! चालतांना सुकलेल्या पानांच्या गालिचावरचा तो सुंदर, करकर आवाज. आम्ही पानं कधीच झाडून काढली नाहीत. पावसाच्या तडाख्यात जमिनीची धूप होऊ नये म्हणून त्यांचं ते जमिनीवरचं पांघरूण असतं. मग पावसाचं पाणी, या पानांमधून जमिनीमध्ये शोषलं जातं.





आमची सगळ्यांचीच वयं वाढत चालली होती. चिट्टीचंही. आताशा तिला जास्तीत जास्त वेळ घराभोवतीच हिंडायला आवडे. अजूनही झाडांवरच्या लंगूरांचा पाठलाग करण्याची हौस होती तिला. पण पूर्वीची चपळाई राहिली नव्हती. काही वर्षांपूर्वी स्क्रॅबल गेला आणि चिट्टी आता घराची प्रौढ, कुटुंब-स्वामिनी झाली होती. आपल्या मर्जीप्रमाणे ती आयुष्य मजेत जगत होती.

# ऋतु उदासीचा



तो एक उन्हाळ्यातला दिवस. चिट्टीनं अचानक अन्नत्याग केला. पोट बिघडलं, की पोटाला विश्रांती म्हणून उपास करायचा असतो, हे कुत्र्यांना बरोबर कळतं, म्हणून मी चिट्टीकडे दुर्लक्ष केलं. पण तिचा हा उपास अनेक दिवस सुरूच राहिल्यावर मात्र मी तिला प्राण्यांच्या डॉक्टरकडे घेऊन गेले. तिच्या काही चाचण्या केल्यावर, तिची मूत्रपिंडं योग्यप्रकारे काम करीत नव्हती असं निदान झालं. तिला दिलेली औषधं तिला अजिबात आवडली नाहीत. अधून मधून केव्हातरी खायची, पण अन्नावरची तिची वासना उडाली होती. मग मुनाफ भाई आले. “अगं चिट्टीबाई, हे बघ तुझ्यासाठी मी काय आणलंय”, असं म्हणून त्यांनी ‘पेडवा’ मासा जोशात हवेत भिरकावला. ओह! तिचे डोळे चमकले आणि तिनं पटकन मासा गट्टम केला खरा, पण नंतर ओकून काढला.

चिट्टी आजारी होती खरी, परंतु काही बाबतीत महा वस्ताद होती. योगी नावाचा मी नवा कुत्रा पाळला होता. त्याच्यासाठी आणलेलं हाडूक, त्याचं लक्ष नसतांना ती पटकन आपल्या बिछायतीखाली लपवायची. खायची इच्छा नसली म्हणून काय झालं! वास्तविक तिच्या आजारपणामुळे मला आतून पिळवटून येत असतांनाही तिची वस्तादगिरी पाहून मला खूप हसू फुटे. माझी उदास मन:स्थिती एकीकडे आणि दुसरीकडे 'मला कुठे काय झालंय' असा चिट्टीचा आब राखणारा आविर्भाव. आपल्या वाट्याला आलेलं आजारपण तिनं सहजपणे स्वीकारलं होतं. ती अगदी शांत होती.



माझ्या घरी चिट्टी आली तेव्हा पावसाळा होता. गेली तेव्हाही पावसाळाच होता. तिनं तिच्या आयुष्यात एकंदरीत तेरा पावसाळे पाहिले. त्या दिवशी आकाश बदाबदा पाणी ओतत होतं आणि सलग पाच दिवस वीज नव्हती. चिट्टी गेली, तेव्हा तिच्या शेजारी मेणबत्तीच्या उजेडात पहाट होण्याची वाट बघत मी बसून होते. उघड्या आकाशाखाली बसण्याची तिची एक आवडती जागा होती. त्या जागेवरून भाताची शेतं, फळबागा आणि त्यापलीकडचं जंगल असा विस्तीर्ण प्रदेश दिसत असे. त्या तिच्या आवडत्या जागी आम्ही तिला पुरली. आता जमिनीत पहुडल्या पहुडल्या चिट्टी मनसोक्त ग्रह-तारे निरीक्षण करू शकणार होती. माझा हा आवडता जीव, आता दिगंतराला गेला होता.



चिट्टी मला कधीतरी सोडून जाणार आहे, याची कल्पना होती. पण इतक्या लवकर? कुठे गेली असेल? तिच्याशिवाय सगळंच उदास, ओकंबोकं वाटायला लागलं. आपल्या आयुष्याचा एक भाग असलेलं असं कुणी कायमचं सोडून गेलं, तर अशी भावना मनात घर करते. आता तो जीव ना तुम्हाला परत कधी दिसणार असतो, ना त्याचा कधी वास येणार असतो, ना त्याला परत कधी तुम्हाला स्पर्श करता येणार असतो. ते एक अटळ सत्य असतं. चिट्टी गेल्यामुळे मी दु:खानं इतकी सुन्न होऊन गेले, की मला रडूसुद्धा फुटेना.





# आयुष्याचं अविरत चक्र

दिवस, आठवडे, महिने गेले, तरी चिट्टीच्या जाण्याची वेदना कमी होण्याचं नाव घेईना. एकदा, किमान एकदा तिला जवळ घेण्याची, कुशीत धरण्याची आणि तिचा मुका घेण्याची अनिवार इच्छा मनात निर्माण होत राहिली. एक वर्ष उलटून गेलं तरीही मी आतून तिच्या आठवणीत तगमगत राहिले. आत्तापर्यंत जेव्हा केव्हा मी अस्वस्थ होत असे, तेव्हा तेव्हा माझ्या कानात जंगल त्यावरचा उपाय सुचवीत असे. यावेळी मात्र अजूनही मी मानसिक शांततेसाठी आणि चिट्टीच्या मृत्यूला स्वीकारण्यासाठी धडपडत होते.

चिट्टी जिथे चिरविश्रांती घेत होती, त्या जागी एके दिवशी सूर्यास्ताच्या वेळी ‘आपल्याला इतका त्रास का होतो आहे’, याचा मी विचार करीत बसले होते. तिनं स्वत: सहजपणे आणि आपखुशीनं मृत्यू स्वीकारला असतांना, मी इतकी उदास का? त्या क्षणी मला तिचं आकाश निरीक्षणाचं प्रेम आठवलं. रात्री आकाशाकडे बघतांना तिला विश्वाचा किनारा दिसला असावा कदाचित, असं मला अचानक वाटलं. आपण सगळेच एका खूप मोठ्या ब्रह्मांडातला अगदी सूक्ष्म जीव आहोत, असं तिला तिच्या प्राण्याच्या शहाणपणाच्या पातळीवर जाणवल्यामुळे एकप्रकारे स्थिरचित्त शांतता आली असावी. आजवर मला जे उमगलं नव्हतं, ते चिट्टीच्या रुपातल्या माझ्या शहाण्या वनदेवतेनं मला जाणवून दिलं होतं. अवकाशातल्या गोष्टी जाणून घेण्यासाठी तिला कुठल्याही ‘हबल दुर्बिणीची’ गरज नव्हती. अवकाशग्रहणाचं एक यंत्र तिच्या शरीरातच वसलेलं होतं.

वसंताच्या आगमनापासून आयुष्याला पुन्हा धुमारे फुटू लागल्याची वर्दी, चिट्टीच्या समाधीभोवतीचं वाढतं गवत आणि डुलणारी जंगली फुलं माझ्यापाशी घेऊन आली. हे खरोखरीच निसर्गाचं अव्याहत, भव्य चक्र. चिट्टी आता वसुंधरेचा एक भाग झाली होती. तिला आता वेगळी करता येणं अशक्य होतं. जंगलानं तिला आपल्या कुशीत घेतली होती आणि आता ते एकमेकांचे झाले होते.

हे विचार मनात येत गेले, तशी एकीकडे माझे डोळे भरून येता येता, दुसरीकडे माझ्या हृदयाला हलकं हलकं हसू फुटायला लागलं. नीरव शांततेत आकाशात पहिला तारा लुकलुकायला लागला. रात्र चढायला लागली, तशी नव्या रात्रीबरोबरची ठरलेली भेट साजरी करण्यासाठी रातकिडे किरकिर करू लागले.

आता यापुढे चिट्टीशिवाय जगायचं आहे, हे मला माहीत होतं. माझ्या आयुष्यात चिट्टीसारखं कुणीही परत येणार नाही, याचीही मला जाणीव होती. परंतु जिवंत वा मृत, आपल्या सर्वांना जोडणारा काहीतरी दुवा आहे, असं मला आतून वाटू लागलं.

मी सावकाश माझ्या शेतघराकडे परतले. आता माझी पावलंही जड नव्हती आणि हृदयही जड नव्हतं. आणि चिट्टी? काय सांगू, ती तर माझ्या बरोबरच होती. नेहेमीसारखी.





# चिट्टी
## एक भूभू आणि तिचं जंगलातलं शेत

कथा: सेरो
रेखाचित्रं: राजीव आइप
आतली मांडणी आणि शब्दलेखन: तान्या मजुमदार
मराठी लेआउट: कनक शशि
अनुवाद: सुजाता देशमुख
सम्पादन: रमा हर्डीकर-सखदेव

मराठी अनुवाद: एकलव्य फाउंडेशन, जून २०२३
चित्रे: कल्पवृक्ष, जून २०२३

हे पुस्तक Creative Commons license Attribution NonCommercial- ShareAlike 4.0 International (CC BY-NC-SA 4.0). लायसन्सच्या अंतर्गत आहे ज्याचे विवरण http://creativecommons.org/licenses/by-nc-sa वर उपलब्ध आहे.

वरीलप्रमाणे क्रिएटीव कॉमन्स लायसन्सअनुसार बिगर व्यावसायिक उद्देशाने मोफत वितरणासाठी या पुस्तकाचा उपयोग केला जाऊ शकतो. तसे करताना मूळ स्रोताच्या लेखक आणि प्रकाशकाचा उल्लेख करून ते सूचित करणे गरजेचे असेल. अन्य कुठल्याही उपयोगासाठी प्रकाशकांच्या मार्फत लेखकांशी अवश्य संपर्क करा.

पराग इनिशिएटीव्ह, टाटा ट्रस्ट यांच्या आर्थिक मदतीतून साकार

पहिली आवृत्ती: जून २०२३ (२००० प्रति)
कागद: १०० जीएसएम मॅपलिथो आणि २१० जीएसएम एफएफबी (मुखपृष्ठ)
ISBN: 978-93-94552-94-4
मूल्य: रु 115.00

हे पुस्तक इंग्रजीमध्ये *Chitty - A Dog & Her Forest Farm* आणि हिंदीमध्येही *चिट्टी - एक कुत्ता और उसका जंगल फार्म* या नावाने उपलब्ध आहे.

प्रकाशक: एकलव्य फाउंडेशन
जमनालाल बजाज परिसर
जाटखेडी, भोपाळ 462 026 (मध्य प्रदेश)
फोन: +91 755 297 7770-71-72
www.eklavya.in; books@eklavya.in

मुद्रक: आर के सिक्युप्रिंट, भोपाल; फोन: +91 755 268 7589



**सेरो** हे समुद्रावर प्रेम करणाऱ्या एका अष्टभुजा ऑक्टोपसचं टोपणनाव असून, तिचे आठही हात काम करायला, खेळायला आणि मिठ्या मारायला कधीही तयार असतात. सतत खोड्या काढणे हा तिचा आवडता छंद असून, आपल्या बिरादरीबरोबर ती जंगलात राहते. त्यांचा आहार म्हणजे, तिथल्या वाळवीच्या डोंगरातल्या वाळव्या.



**राजीव आइप** बंगळुरूमध्ये राहतो. तो अनेक प्रकल्पांसाठी व्यंगचित्रं आणि रेखाचित्रं काढतो. वहीत येताजाता चित्रं काढायची, प्रकृतीला मानवत नसतांनाही नको तितकी कॉफी प्यायची, कामाच्या जागी पसारा घालायचा आणि अधूनमधून शून्यात दृष्टी लावून बसायचं! हा त्याचा परिपाठ.

चिट्ठी पश्चिम घाटातल्या जंगलातल्या शेतघरात मनमुक्त आयुष्य जगते. जंगली प्राण्यांच्या बरोबर तिला चित्तथरारक अनुभव येतात. ती गपागप वाळव्या खाते. फणसाचे काप तिला भलतेच प्रिय! विलक्षण वेगळं मन आणि अंत:करण असलेली चिट्ठी अतिशय शहाणी आणि ईमानी मैत्रीण आहे. जंगलातल्या या भटकंतीबरोबर चिट्ठीचे धाडसी उद्योग वाचा. तिचं सुंदर जग पाहता पाहता तुमच्या ओठांवर हसू आणि डोळ्यांत पाणी येईल.




parag
AN INITIATIVE OF TATA TRUSTS
KALPAVRIKSH
कल्पवृक्ष
एकलव्य
₹ 115.00
9 789394 552944